# महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड

''अदाणी हाऊस'' मिठाखाली सिक्स रोड्सजवळ, नवरंगपुरा, अहमदाबाद – ३८० ००९ वेबसाईट: www.megptcl.com

## जाहीर सूचना

**भांडवली खर्चाची निश्चिती, वित्तिय वर्ष २०१३–१४ व वित्तिय वर्ष २०१४–१५ चे ट्रुइंग–अप, वित्तिय वर्ष २०१५–१६ चे प्रस्तावित ट्रुइंग–अप आणि वित्तिय वर्ष २०१६–१७ ते वित्तिय वर्ष २०१९–२० साठी एआरआरचा अंदाज यांच्यासाठी महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड यांनी केलेल्या याचिकेवर सूचना/हरकती.**

१. महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड यांनी भांडवली खर्चाची निश्चिती, वित्तिय वर्ष २०१३–१४ व वित्तिय वर्ष २०१४–१५ चे ट्रुइंग–अप, वित्तिय वर्ष २०१५–१६ चे प्रस्तावित ट्रुइंग–अप आणि वित्तिय वर्ष २०१६–१७ ते वित्तिय वर्ष २०१९–२० साठी वार्षिक महसूली आवश्यकता (एआरआर) अंदाज यांच्यासाठी (२०१६ चा खटला क्र. ५०) एक याचिका दाखल केली आहे. वित्तिय वर्ष २०१३–१४ आणि वित्तिय वर्ष २०१४–१५ यांचे ट्रुइंग–अप आणि वित्तिय वर्ष २०१५–१६ चे प्रस्तावित ट्रुइंग–अप हे एमईआरसी (मल्टि इयर टॅरीफ) रेग्युलेशन्स, २०११ च्या लागू होणाऱ्या तरतूदींच्या आधारावर सादर करण्यात आले आहे. वित्तिय वर्ष २०१६–१७ पासून वित्तिय वर्ष २०१९–२० पर्यंतच्या नियंत्रण कालावधीचे सादरीकरण एमईआरसी (मल्टि इयर टॅरीफ) रेग्युलेशन्स, २०१५ व संबंधित इतर रेग्युलेशन्स यांच्यामधील लागू होणाऱ्या तरतुदींच्या आधारे सादर केले आहे.

२. आयोगाने ही याचिका १२ एप्रिल, २०१६ मध्ये दाखल करून घेतली असून एमईजीपीटीसीएल यांना विद्युत कायदा २००३ च्या कलम ६४(२) अंतर्गत जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी एक जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

३. या याचिकेची ठळक वैशिष्ट्ये खाली देण्यात येत आहेत:

**कोष्टक १: एमईजीपीटीसीएल यांच्या पारेषण प्रणालीचा भांडवली खर्च (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशिल | तत्त्वत: मंजुरी | व्यावसायिक योजना | खटला क्र. ६६ सन २०१४ वरील एमवायटी आदेश | वर्तमान याचिकेनुसार भांडवली खर्च | फरक (याचिका तत्त्वत: मंजुरी) | फरक (याचिका एमवायटी आदेश) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | A | B | C | D | D - A | D - C |
| १ | प्राथमिक खर्च | ४.०० | ४.०० | ४.०० | ०.७५ | (३.२५) | (३.२५) |
| २ | पारेषण लाईन्स | २,२१०.७१ | २,२१२.३३ | २,३३५.८६ | २,४३५.५५ | २२४.८४ | ९९.६९ |
| ३ | सबस्टेशनची कामे | १,९४६.८८ | १,९६३.१६ | २,२२१.६४ | २,२८३.३९ | ३३६.५१ | ६१.७५ |
| ४ | सुधारित कर व अधिभार | – | ३८.५० | ४६.२९ | ४४.३५ | ४४.३५ | (१.९४) |
| ५ | वरकड खर्च | ३१७.३१ | ३६३.७८ | ३१७.३० | २२६.१२ | (९१.१९) | (९१.१८) |
| ६ | औरंगाबाद सबस्टेशनमधील बेजसाठी भरावाचे काम + सिव्हिल वर्क | ३२.०० | ३२.०० | ३२.०० | २८.८९ | (३.११) | (३.११) |
| ७ | कर्जपुरवठा व आय.डी.सी. | २१०.९८ | ४६७.५७ | ६१०.७४ | ५७४.२५ | ३६३.२७ | (३६.४९) |
| ८ | विदेशी मुद्रा विनिमयाच्या दरात फेरफार झाल्याचा परिणाम | – | २०९.५७ | १६२.२६ | १८०.५६ | १८०.५६ | १८.३० |
| **९** | **एकूण (१ ते ८)** | **४,७२१.८८** | **५,२९०.९१** | **५,७३०.१०** | **५,७७३.८७** | **१,०५१.९९** | **४३.७७** |

**कोष्टक २: वित्तिय वर्ष २०१३–१४ ते वित्तिय वर्ष २०१६–१७ साठी भांडवली उभारणी (रु. कोटी)**

| तपशिल | वि. व. २०१३–१४ | वि. व. २०१४–१५ | वि. व. २०१५–१६ | वि. व. २०१६–१७ |
|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष* | प्रत्यक्ष | अंदाजे | अंदाजे |
| भांडवली खर्च | ४८४९.८९ | ९२३.९७ | २४.५९ | ७.५० |
| भांडवल उभारणी | २२१३.६७ | ३५६०.१९ | २४.५९ | ७.५० |

* वित्तिय वर्ष २०१३–१४ पर्यंतचा भांडवली खर्च व भांडवल उभारणी हे वित्तिय वर्ष २०१३–१४ मध्ये दाखविले आहेत.

**कोष्टक ३: वित्तिय वर्ष २०१३–१४ आणि वित्तिय वर्ष २०१४–१५ यांच्यासाठी ट्रु अप (रु. कोटी)**

| अनु. क्र. | तपशील | वित्तिय वर्ष २०१३–१४ | | वित्तिय वर्ष २०१४–१५ | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१४च्या केस नं. ६६ मध्ये मंजूरी | एमईजीपीटीसीएल याचिका (प्रत्यक्ष) | २०१४च्या केस नं. ६६ मध्ये मंजूरी | एमईजीपीटीसीएल याचिका (प्रत्यक्ष) |
| १ | कामकाज आणि देखभाल खर्च | ४.७१ | ५.२५ | ५१.४८ | ५८.३५ |
| २ | घसारा खर्च | ११.७५ | ११.८३ | १४२.२२ | १४४.२७ |
| ३ | दीर्घकालिक भांडवली कर्जावरील व्याज | १७.६८ | १७.५८ | २१६.१८ | २०६.४८ |
| ४ | खेळते भांडवल आणि ग्राहकांच्या सुरक्षा ठेवी यांच्यावरील व्याज | ०.९८ | १.०४ | ११.५१ | १२.०८ |
| ५ | आयकर | २.७५ | ४.५९ | ३०.१७ | ४३.०४ |
| ६ | आकस्मिक राखीव निधीसाठी योगदान | ५.४९ | ५.५३ | ६.७६ | ६.८२ |
| **७** | **एकंदर महसूली खर्च** | **४३.३६** | **४५.८२** | **४५८.३२** | **४७१.०३** |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | १०.३६ | १०.४३ | ११३.७५ | १२७.२७ |
| **९** | **एकूण महसूली आवश्यकता** | **५३.७१** | **५६.२६** | **५७२.०७** | **५९८.३१** |
| १० | वजा: बिगर टॅरीफचे उत्पन्न | – | – | ०.२४ | – |
| ११ | वजा: इतर व्यवसायातून उत्पन्न | – | – | – | – |
| **१२** | **पारेषणच्या टॅरीफमधून निव्वळ एकंदर महसूली आवश्यकता** | **५३.७१** | **५६.२६** | **५७१.८३** | **५९८.३१** |

**कोष्टक ४: ट्रुइंग–अप आणि संबंधित दावे यांचा परिणाम (रु. कोटी)**

| अनु. क्र. | तपशील | सूत्र | वित्तिय वर्ष २०१३–१४ | वित्तिय वर्ष २०१४–१५ |
|---|---|---|---|---|
| १ | एमवायटी आदेशाद्वारे मंजूर केलेला एआरआर | a | ५३.७१ | ५७१.८३ |
| २ | ग्राहकांकडे सुपूर्द करावयाचा नियंत्रण करता न येण्याजोग्या (अनकंट्रोलेबल) घटकांमुळे लाभ/(तोटा) | b | २.५४ | २६.४८ |
| ३ | ग्राहकांकडे सुपूर्द करावयाचा नियंत्रण करता येण्याजोग्या (कंट्रोलेबल) घटकांमुळे १/३ लाभ/(तोटा) | c | – | – |
| **४** | **ट्रूड अप एआरआर** | **d = a+b+c** | **५६.२५** | **५९८.३१** |
| ५ | इन्सेन्टिव्हची उपलब्धता | e | १.०० | १०.६८ |
| ६ | वित्तिय वर्ष २०१३–१४ च्या वाढत जाणाऱ्या एआरआरच्या वसुलीमध्ये विलंब झाल्यामुळे वहनखर्च | f | १.०४ | – |
| ७ | वित्तिय वर्ष २०१४–१५ च्या एआरआरच्या वसुलीमध्ये विलंब झाल्यामुळे वहनखर्च | g | – | ५०.७० |
| ८ | संपूर्ण वर्षात टिएसयूजकडून वसुल करण्यात आलेला एकूण महसूल | h | ५३.७१ | ५७१.८३ |
| **९** | **महसूलातील तफावत/(नफा)** | **i=d+e+f+g-h** | **४.५८** | **८७.८६** |

**कोष्टक ५: वित्तिय वर्ष २०१५–१६ च्या एआरआरचे प्रस्तावित ट्रुइंग–अप (रु. कोटी)**

| अनु. क्र. | तपशील | वित्तिय वर्ष २०१५–१६ | |
|---|---|---|---|
| | | २०१४च्या केस नं. ६६ मध्ये मंजूरी | एमईजीपीटीसीएल याचिका (अंदाजे) |
| १ | कामकाज आणि देखभाल खर्च | ९९.२० | ११८.४३ |
| २ | घसारा खर्च | ३००.१६ | ३०४.१७ |
| ३ | दीर्घकालिक भांडवली कर्जावरील व्याज | ४२४.९८ | ४४०.७४ |
| ४ | खेळते भांडवल आणि ग्राहकांच्या सुरक्षा ठेवी यांच्यावरील व्याज | २३.९८ | २५.६२ |
| ५ | आयकर | ७०.३५ | ९८.६६ |
| ६ | आकस्मिक राखीव निधीसाठी योगदान | १४.३३ | १४.४३ |
| **७** | **एकूण महसूली खर्च** | **९३३.००** | **१,००२.०६** |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | २६५.२९ | २६९.०६ |
| **९** | **एकंदर महसूली आवश्यकता** | **१,१९८.२८** | **१,२७१.१२** |
| १० | वजा: बिगर टॅरीफचे उत्पन्न | ०.७८ | – |
| ११ | वजा: इतर व्यवसायातून उत्पन्न | – | – |
| **१२** | **पारेषणच्या टॅरीफमधून निव्वळ एकंदर महसूली आवश्यकता** | **१,१९७.५०** | **१,२७१.१२** |

**कोष्टक ७: वित्तिय वर्ष २०१६–१७ ते वित्तिय वर्ष २०१९–२० साठी एकंदर महसूली आवश्यकतेचा सारांश (रु. कोटी)**

| अनु. क्र. | तपशील | वित्तिय वर्ष २०१६–१७ | वित्तिय वर्ष २०१७–१८ | वित्तिय वर्ष २०१८–१९ | वित्तिय वर्ष २०१९–२० |
|---|---|---|---|---|---|
| १ | कामकाज आणि देखभाल खर्च | १२५.४७ | १३२.९३ | १४०.८३ | १४९.२० |
| २ | घसारा खर्च | ३०५.०० | ३०५.२० | ३०५.२० | ३०५.२० |
| ३ | दीर्घकालिक भांडवली कर्जावरील व्याज | ३९२.९८ | ३५९.६४ | ३२५.८५ | २९१.९० |
| ४ | खेळते भांडवल आणि ग्राहकांच्या सुरक्षा ठेवी यांच्यावरील व्याज | २३.६३ | २३.३५ | २३.०५ | २२.७६ |
| ५ | इतर खर्च | ७३.२० | ७३.२५ | ७३.२५ | ७३.२५ |
| ६ | आकस्मिक राखीव निधीसाठी योगदान | १४.५० | १४.५१ | १४.५१ | १४.५१ |
| **७** | **एकूण महसूली खर्च** | **९३४.७८** | **९०८.८८** | **८८२.७०** | **८५६.८३** |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | २६९.८० | २६९.९८ | २६९.९८ | २६९.९८ |
| **९** | **एकंदर महसूली आवश्यकता** | **१२०४.५९** | **११७८.८६** | **११५२.६८** | **११२६.८१** |
| १० | वजा: बिगर टॅरीफचे उत्पन्न | १.५३ | २.६६ | ३.८० | ४.९३ |
| ११ | वजा: इतर व्यवसायातून उत्पन्न | – | – | – | – |
| **१२** | **पारेषणच्या टॅरीफमधून एकंदर महसूली आवश्यकता** | **१२०३.०६** | **११७६.२०** | **११४८.८८** | **११२१.८८** |

४. पुढील दस्तऐवजांच्या प्रती लेखी विनंती केल्यास एमईजीपीटीसीएलच्या कार्यालयातून मिळविता येऊ शकतील:

a. प्रस्तावांचा कार्यकारी सारांश (मराठी/इंग्रजीमध्ये विनामूल्य).

b. सीडीसह सविस्तर याचिका दस्तऐवज (इंग्रजीमध्ये) ''**महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड**'' यांच्या नावे काढलेला (रु. १५०/– चा डीडी/रोख रक्कम भरणा केल्यास).

c. सविस्तर याचिका दस्तऐवज (इंग्रजीमध्ये) (रु. १००/– भरणा केल्यास).

d. सविस्तर याचिका दस्तऐवजाची सीडी (इंग्रजीमध्ये) (रु. ५०/– चा भरणा केल्यास)

| कार्यालय | पत्ता | दूरध्वनी/फॅक्स क्र. | ई–मेल |
|---|---|---|---|
| नोंदणीकृत कार्यालय | महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड ''अदाणी हाऊस'' मिठाखाली सिक्स रोड्स जवळ, नवरंगपुरा, अहमदाबाद – ३८० ००९ | दूरध्वनी: +९१ ७९२५५५७६३४<br>फॅक्स: + ९१ ७९२५५५८७५८ | jignesh.langalia@adani.com |

५. आयोगाने ह्या सूचनेद्वारे एमईजीपीटीसीएलला जनतेकडून त्यांच्या याचिकेसंदर्भात सूचना/हरकती मागविण्याचे निर्देश दिले आहेत. सूचना/हरकती ह्या सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३वा मजला सेंटर क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई – ४०० ००५ येथे गुरुवार, ०५ मे, २०१६ पर्यंत इंग्रजी किंवा मराठीमध्ये सहा (१+५) प्रतींमध्ये किंवा फॅक्स अथवा ई–मेल द्वारे (फॅक्स: ०२२ २२१६३९७६, ई–मेल: mercindia@merc.gov.in) एमईजीपीटीसीएल (जिग्नेश लंगालिया, महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड, ''अचलराज'' मेयर बंगल्यासमोर, लॉ गार्डन, अहमदाबाद – ३८० ००६, फॅक्स नं. ९१ ७९२५५५८७५८, ई–मेल आयडी: jignesh.langalia@adani.com) यांना सेवा पुरविल्याच्या पुराव्यासह सादर केल्या पाहिजेत आणि त्यामध्ये पाठविणाऱ्याचे संपूर्ण नाव, टपालाचा पत्ता, आणि असल्यास, ई–मेल ॲड्रेस असला पाहिजे. सदर हरकत कोणतीही संस्था किंवा ग्राहकांची वर्गवारी यांच्या वतीने दाखल करण्यात येत आहे काय असे देखील सूचित करण्यात आले पाहिजे. पाठविणाऱ्यास सुनावणीसाठी प्रत्यक्ष हजर रहावयाचे आहे काय हे देखील नमूद करण्यात आले पाहिजे जेणेकरून अशा परिस्थितीत आयोगाचे कार्यालय, १३वा मजला, सेंटर क्र. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५ येथे शुक्रवार, ०६ मे, २०१६ रोजी ११.३० वाजता घेण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळेस सदर व्यक्तीला आयोगाकडून बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल आणि यासाठी कोणतीही स्वतंत्र सूचना दिली जाणार नाही.

६. एमईजीपीटीसीएल हे गुरुवार, ०५ मे, २०१६ पर्यंत मिळालेल्या सर्व सूचना/हरकती यांना सदर प्रत्येक सूचना/हरकती मिळाल्यापासून ३ दिवसांच्या आत, परंतु शुक्रवार, ०६ मे, २०१६ च्या आत उत्तर देतील. याबाबतच्या एमईजीपीटीसीएलकडून मिळालेल्या उत्तरांना जाहीर सुनावणी दरम्यान किंवा बुधवार, ११ मे, २०१६ पर्यंत प्रत्युत्तर देता येऊ शकेल.

७. सविस्तर याचिका दस्तऐवज आणि त्याचा सारांश हे एमईजीपीटीसीएलच्या वेबसाईट www.megptcl.com वर उपलब्ध आहे. त्याचा कार्यकारी सारांश आयोगाच्या वेबसाईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in वर देखील (विनामूल्य) डाऊनलोड करता येण्यासारख्या स्वरूपात उपलब्ध आहे.

सही

**जिग्नेश लंगालिया**

हुद्दा: असोसिएट जनरल मॅनेजर

**महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड**

स्थळ: अहमदाबाद

तारीख: १४ एप्रिल, २०१६